जा.क्र.                                                                 दि. २५  जुलै,२०२३

# परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**
**कृषी विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील रूपांतरीत कृषी महाविद्यालयांचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करणेबाबत.**

कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृषिवि-३७२३ / प्र.क्र.१४९ / ७-अे, दि.२४/७/२०२३ अन्वये खालील कायमस्वरूपी विना अनुदानित रूपांतरीत कृषी महाविद्यालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. सदर महाविद्यालयांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| महा-विद्यालयाचा सांकेतांक क्रमांक | महाविद्यालयाचे नाव व पत्ता, ई-मेल पत्ता | एकूण वार्षिक शुल्क रूपये | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक | वसतीगृह सुविधा (मुले/मुली) |
|---|---|---|---|---|---|
| ११३१२ | कृषी महाविद्यालय, दिवानमळा (लळींग) ता.जि. धुळे<br>email-principal.sspmagridhule@gmail.com | ७०,००० | श्री. एन. एच. जांभळे | ७७९८५८०९०२<br>८८३०७९३३०३ | आहे (मर्यादित) |
| ११३१३ | कृषी महाविद्यालय, मु. मदडगाव, पो. भतोडी ता.जि. अहमदनगर.<br>Email- rajlaxmifoundation@rediffmail.com | ७०,००० | डॉ. जी. बी. जानवळे | ९३०७०७५१२७<br>९३०७०७५२९९ | आहे (मर्यादित) |

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामधील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या नियोजित वेळापत्रकानुसार दि. २०/०७/२०२३ पर्यंत प्रवेश अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ३.१० अनुसार तक्रार नोंदणीच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच दि.२७/०७/२०२३ पर्यंत महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम (विकल्प) अद्ययावत करण्याची तरतूद आहे.

यास्तव दि. २०/०७/२०२३ पर्यंत प्रवेश अर्ज दाखल केलेल्या सर्व पात्र उमेदवारांना नव्याने मान्यता दिलेल्या महाविद्यालयांचा प्राधान्यक्रमामध्ये समावेश करण्याची सुविधा उमेदवारांच्या लॉग-इनद्वारे दि. २७/०७/२०२३ पर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वरील नवीन महाविद्यालयांना संस्थास्तरीय कोटयातील जागा (अंशतः किंवा पूर्णतः) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करावयाच्या असल्यास त्यांनी दि. २७/७/२०२३ पर्यंत कृषी परिषद व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षास ई-मेलद्वारे कळविण्याचे सूचित करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी याबाबतची नोंद घ्यावी.

**आयुक्त**
**राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष**